महाराष्ट्र शासन
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१
www.dvet.gov.in ; desk10@dvet.gov.in ; ०२२-२२६२०६०४/२९३

क्रमांक - १०/एटीएस/२०२४/प्र.क्र.५२/ ९९९
दिनांक : 05/07/2024

प्रति,
कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार यांच्याद्वारे
नियुक्त केलेल्या सर्व Third -Party Aggregator (TPA)
(यादी सोबत जोडली आहे)

**विषय :** **Third -Party Aggregator (TPA) च्या सहाय्याने शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ अंतर्गत राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना (NAPS),महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना (MAPS) व मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेची महाराष्ट्र राज्यात अंमलबजावणी करणे बाबत.**

आपणास केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार यांच्याद्वारे शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ अंतर्गत Section ८(२) अन्वये Third-Party Aggregator (TPA) ची नियुक्ती करण्यांत आलेली असून आपण Third-Party Aggregator (TPA) म्हणून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेची (NAPS) महाराष्ट्र राज्यात अंमलबजावणी करीत आहात. यासाठी आपणास केंद्र शासनाने शिकाऊ उमेदवारी नोंदणीचे लक्ष्य (Target) ठरवून दिलेले आहेत.

आपण महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्हातील मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र Third-Party Aggregator (TPA) च्या मदतीने शिकाऊ उमेदवारी योजनेची व्याप्ती वाढविण्याचे कार्य करीत असून व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय मार्फत महाराष्ट्र राज्यात कार्यरत सर्व Third-Party Aggregator (TPA) सोबत केंद्र शासनाच्या प्रादेशिक कौशल्य विकास व उद्योजकता संचालनालय कार्यालयाच्या सहाय्याने दिनांक ११ जुन २०२४ रोजी VC द्वारे बैठक घेऊन आपणास महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजने बाबत सर्व माहिती देण्यात आलेली आहे. तसेच आपल्या सहकार्याने जास्तीत जास्त शिकाऊ उमेदवारांनी महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजने अंतर्गत देय विद्यावेतनाचा लाभ प्राप्त करून घेण्यासाठी maps.dvet.gov.in या पोर्टलवर नोंदणी करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

मा. वित्त मंत्री महोदयांनी सन २०२४-२५ चा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करताना महाराष्ट्र राज्यामध्ये **मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना** राबविण्याचे घोषित केलेले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जन-कल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवली जाणार आहे. मा.मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेवर आधारित या उपक्रमांतर्गत कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या संकेतस्थळाच्या माध्यमातून रोजगार इच्छुक उमेदवार आणि रोजगार उपलब्ध करून देणारे उद्योजक जोडले जातील. उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ ६ महिन्यासाठी कार्य प्रशिक्षण योजनेद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल. रोजगार इच्छुक उमेदवार विभागाचे संकेतस्थळावर कार्य प्रशिक्षणासाठी सुलभतेने नोंदणी करू शकतील. त्याचप्रमाणे प्रशिक्षण देऊ इच्छिणारे उद्योजक व इतर कमीतकमी २० कर्मचारी कार्यरत अस्थापना विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी करतील. कार्य प्रशिक्षणासाठी नोंदणी करून कार्य प्रशिक्षण करणाऱ्या इयत्ता बारावी उतीर्ण उमेदवारांना रुपये ८,०००/- आय. टी. आय. व पदविका उतीर्ण उमेदवारांना रुपये ९,०००/- व पदवी/पदव्युत्तर उतीर्ण उमेदवारांना रुपये १०,०००/- या प्रमाणे प्रतिमाह रक्कम शासनाकडून DBT द्वारे अदा करण्यात येणार आहे.

या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने Third Party Aggregator (TPA) च्या माध्यमातून उमेदवार व अस्थापना यांची नोंदणी करून योजनेची महाराष्ट्र राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर योजनेसाठी आपली **Third-Party Aggregator (TPA)** म्हणून नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे. या अनुषंगाने आवश्यक शासन निर्णय शासन स्तरावरून निर्गमित करण्याचे प्रस्तावित आहे.

आपणास सूचित करण्यात येते की, शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ अंतर्गत राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना (NAPS) व महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना (MAPS) यांच्या अंमलबजावणी व्यतिरिक्त आपण मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेची महाराष्ट्र राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करून आवश्यक कार्यवाही करावी.

आपली विश्वासू

निधि चौधरी (भा.प्र.से.)
आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व
उद्योजकता आयुक्तालय
(व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय)

**प्रत :** मा. सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मत्रालय, मुंबई-३२ यांना
**माहितीकरिता** सविनय सादर.